# भारत-चीन संरक्षण विषयक संबंध

**डॉ.विजय जालिंदर देठे,** राज्यशास्त्र विभाग, **छ.** शहाजी महाविद्यालय, कोल्हापूर

**गोषवारा** : चीन व भारत हे देश आज जगातील जलद विकसित होत जाणाऱ्या महान अर्थसत्तांचे प्रतिनिधित्व करत आहेत. जगामध्ये आर्थिक महामंदी असताना या देशांना इतर देशांच्या तुलनेत मंदीचा जास्त फटका बसला नाही. जगामध्ये महासत्ता बनन्यासाठी आशिया खंडात वर्चस्व निर्माण करण्यावरून चीन भारताबरोबर अधून-मधन सीमासंबंधांचे उल्लंघन करून भारताला शह देण्याचा प्रयत्न करीत आहे. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण करून मानहानीकारक पराभव केला तो दिवस आजही सर्व भारतीयांच्या अंत:करणामध्ये केंद्र करून बसला आहे. १९६२ पासून आजपर्यंत या दोन देशातील संबंध शितयुद्धासारखे आहेत. चीनची महत्त्वकांक्षा आणि डावपेच ओळखत भारताला संरक्षणदृष्ट्या सज्ज होण्यासाठी खंबीर व कठोर पावले उचलावी लागतील
आणि त्याचबरोबर संवादही वाढवावा लागेल. चीन स्वत:चे लष्करी बळ वाढवून विकास करीत भारताच्या शेजारील राष्टांना मोठ्या प्रमाणात आर्थिक व शस्त्रास्त्रांची मदत करीत आहे. शेजारी राष्ट्रांना मदत करून भारताला चारही बाजूंनी जखडण्याचा प्रयत्न चीन कडून होत आहे. तसेच प्रस्तुत लेखामध्ये या दोन राष्ट्रांचा
संरक्षणाच्या दृष्टीने व एकमेकांच्या विरोधात सीमेवर लष्करी सज्जतेचा सविस्तर तौलनिक आढावा घेतला आहे. २० ऑक्टोबर २०१२ रोजी चीनी आक्रमणाला ५० वर्षे पूर्ण झाली. त्याचे औचित्य साधून या लेखामध्ये भारत व चीन यांचे संरक्षणविषयक संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

चीन व भारत हे देश आज जगातील जलद विकसित होत जाणाऱ्या प्रचंड व महान अर्थसत्तांचे प्रतिनिधित्व करत आहेत. असे असले तरी त्यांच्यामध्ये सीमावादावरून संघर्ष पहावयास मिळतो. त्यामुळे त्यांच्यामधील परस्पर संबंधातील प्रक्रिया व संबंध जाणून व समजून घेणे गरजेचे आहे. तत्पूर्वी या दोन देशातील पूर्वावस्था पाहणे अत्यंत गरजेचे आहे. भारत आणि चीन ही राष्ट्रे आशिया खंडातील प्राचीन राष्ट्रे म्हणून ओळखली जातात. साम्यवादी क्रांती होण्यापूर्वी चीनचे वर्णन एक झोपी गेलेला राक्षस व भारताचे वर्णन शांत हत्ती असे केले जाते. १९४९ साली चीन मध्ये माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली साम्यवादी क्रांती झाली. दरम्यानच्या काळामध्ये भारत नुकताच स्वतंत्र झालेला होता. चीन मध्ये साम्यवादी क्रांती होऊन सर्व सत्ता माओ त्से तुंग यांच्या हाती गेली. साम्यवादी शासनास मान्यता देणारे भारत हे जगातील पहिले राष्ट्र आहे. भारत व चीन यांचे जवळचे संबंध आहेत कारण चीनला बौद्ध धर्माची दीक्षा भारतानेच दिली. आजही चीनमध्ये बहुसंख्य लोक बौद्ध धर्माचेच पालन करतात, बौद्ध धर्माचा वारसा, तत्वज्ञान व परंपरा तिबेटी व चिनी लोकांनी जपून ठेवली. चीनने तिबेटमध्ये सैन्य पाठवून तिबेटचा ताबा घेतला व भारताने चीनच्या तिबेटवरील ताब्यास मान्यता दिली. तिबेट हा चीनचा स्वायत्त स्वयंशासित प्रदेश आहे, अशीच याबबत भारताची भूमिका होती. त्यानंतर भारत–चीन संबंधात सुधारणा झाली. त्यावेळी हिंदी–चीनी भाई–भाई चे युग सुरू झाले. १९५५ च्या आफ्रो–आशियाई परिषदेत पंडित नेहरूंनी 'पंचशीलची' घोषणा केली. दरम्यानच्या काळात चीनने आपणास मॅकमोहन रेषा मान्य नाही. असे म्हणत भारताच्या सुमारे १ लाख चौरस कि.मी. प्रदेशावर आपला दावा सांगितला. त्यावेळी भारताने प्रतिकार करण्याचे टाळले. भारताच्या मवाळ राजनीतीचा अंदाज येताच २० ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनने भारताच्या लष्करी ठाण्यांवर चढाई करून अरूणाचल प्रदेशातील अनेक भागांवर कब्जा केला. हिंदी–चिनी भाई–भाई आणि पंचशील या स्वप्नरंजनाला तडा लावून चीन ने २० ऑक्टोबर १९६२ रोजी भारतावर आक्रमण केले व भारताला मानहानीकारक पराभव स्वीकारावा लागला. त्या पराभवाला २०१२ मध्ये ५० वर्षे पूर्ण झाली. याचे औचित्य साधून भारत–चीन संबंध हा लेख लिहिला गेला. सद्य:काळामध्ये जागतिक सत्ता–समीकरणे बदलली आहेत. १९४५ नंतर जगाचा प्रवास द्विध्रुवाकडून एक ध्रुवाकडे आणि सद्य:कालामध्ये बहुध्रुवाकडे होत आहे. त्या काळी तिसऱ्या जगातील आणि विकसनशील म्हणवले जाणारे भारत व चीन आर्थिक महासत्ता बनू पाहत आहेत. असे असले तरी १९६२ चे युद्ध स्मरणातून जात नाही. दोन्ही देशामधील संबंध सुधारण्याची प्रक्रिया चालू असली तरी परस्पराबाबतचा अविश्वास कायम आहे. अरूणाचल प्रदेशावरील आपला हक्क मात्र चीनने कधीही मागे घेतला नाही. येथेच नेहरूंच्या पंचशिल तत्वाला तडा गेला.

चीन व भारत हे देश आज आर्थिक महासत्ता होवू पाहत आहेत. विश्व बँकेने केलेल्या अभ्यासात चीन आणि भारत यांचा जगातील अनुक्रमे दुसरी व चौथी आर्थिक महासत्ता असा उल्लेख केला आहे. याच पार्श्वभूमीवर एकमेकांना शह देण्यासाठी भारत व चीन यांच्या परस्पर संबंधाची समीकरणे चिंताजनक वाटतात. भारताने नेहमीच चीनकडे सलोख्याने व मैत्रीच्या दृष्टीकोनातून पाहिले आहे. याच पार्श्वभूमीवर चीनला संयुक्त राष्ट्रसंघाने सभासदत्व द्यावे असा भारताने आग्रह धरला. अमेरिकेचा साम्यवादी चीनला विरोध होता. १९७२ साली भारताने चीनच्या बाजूने जगामध्ये आवाज उठवला तेव्हा अमेरिकेने चीनला सदस्यत्वासाठी होकार दिला. वरील सर्व बाबींचा विचार करता भारताने नेहमीच चीनच्याबरोबर मैत्रीचे व सहकार्याचे धोरण अवलंबले. चीनने नेहमीच कुरघोडीचे राजकारण केले. भारत–चीन दरम्यानचे संबंध हे नेहमीच संघर्षाचे दिसतात.

आज भारत आणि चीन वेगाने प्रगती करणाऱ्या अर्थव्यवस्था म्हणून पाहिले जाते. याच कारणांमुळे भारताची चारी बाजूंनी नाकाबंदी करण्याची चीनची व्यूहरचना आहे. चीनने आशियाच्या राजकारणावर आपला प्रभाव टाकण्यासाठी भारताविरूद्ध कारवाया

करण्यास प्रारंभ केला आहे. युद्धाची बदलणारी परिभाषा जो देश जितक्या लवकर आत्मसात करेल तोच जगावर राज्य करेल. हे लक्षात घेऊन आपल्या दबाव तंत्रात बदल करण्यात सध्या आघाडीवर असलेल्या चीनचे सर्वच क्षेत्रांतील वाढते वर्चस्व भारतासाठीच नव्हे तर अमेरिकेसाठीही चिंतेचा विषय ठरत आहे.

**भारताच्या शेजारील राष्ट्राला चीनची मदत :**

जगामध्ये महासत्ता बनन्यासाठी आशिया खंडात वर्चस्व निर्माण करणे हा चीनचा प्रमुख उद्देश आहे. या उद्दिष्टाला भारत नेहमीच आड येत आहे असा चीनचा समज आहे. त्यामुळे आशिया खंडातील वर्चस्वासाठी भारताच्या शेजारी राष्ट्रांना आपल्या गोटात समाविष्ट करत चीन प्रत्येक राष्ट्रात पायाभूत सुविधांची उभारणी करत आहे ते पुढील मुद्यानुसार.

१) खनिजतेल मार्ग सुरक्षित ठेवण्यासाठी श्रीलंकेशी चीनने सामंजस्य करार केला आहे.

कोलंबो बंदराचा विकास चीनच्या मदतीने होत आहे. तसेच खनिज तेल प्रक्रिया केंद्रासाठी, चीनने कोट्यावधी डॉलरची गुंतवणूक श्रीलंकेत केली आहे. श्रीलंका व LTTE यांच्या संघर्षामध्ये चीनने श्रीलंकेला युद्ध सामग्री व आर्थिक मदत दिली. सार्कच्या माध्यमातून भारत सार्कमधील सर्वच राष्ट्रांच्या वरती वर्चस्व प्रस्थापित करून प्रभूत्व गाजविण्याचा प्रयत्न करीत आहे असा चुकीचा प्रसार चीन करीत आहे. त्यामुळे कधीतरी भारत सार्कमधील राष्ट्रावर आक्रमण करेल अशी भिती चीन सार्क राष्ट्राच्या मनामध्ये निर्माण करत आहे. भारताला विरोध करण्यासाठी चीनच्या सहकार्याची सार्कमधील राष्ट्रांना किती गरज आहे हे चीन दाखवून देत आहे.

२) पाकिस्तान–चीन मैत्री भारताला अडचणीची ठरत आहे. कारण चीनने पाकिस्तानात लष्करी तळ उभारण्याच्या दृष्टिने प्रयत्न सुरू केले आहेत. पाकिस्तानने भारताकडून बळकावलेला भूभाग कराराद्वारे रीतसर चीनकडे सोपवला आहे. या परिसरात चीन १७ विविध योजनावर काम करीत आहे. तसेच पाकव्याप्त गिलगिट–बाल्टिस्तान परिसरात चीनी लष्कराच्या मुक्त संचारामुळे भारताची चिंता वाढली आहे. चीनला या भागामध्ये पोहचण्यासाठी सागरी मार्गाचा वापर करावा लागत होता. सध्या चीन या भागात रस्ते बांधत आहे. त्यामुळे या भागात चीनचे लष्कर दोन दिवसात पोहचणे शक्य आहे. चीन पाकिस्तानला सर्व क्षेत्रात भारताच्या विरोधात मदत करत आहे. काश्मीर मुद्यावर चीन जरी मौन बाळगत असले तरी सुद्धा काश्मीर प्रश्नात भारताला गुंतवून विकासात अडथळा आणणे हा मुख्य मुद्दा आहे. भारताला दक्षिण आशियातच रोखून धरणे आणि चीनच्या झिंग्यांग प्रदेशातील मुस्लिम बहुल जनतेच्या बंडखोरीला आळा घालण्यासाठी चीनला मुस्लिम शेजाऱ्यांची म्हणजेच पाकिस्तानची गरज भासणे याबाबतचे खुले स्पष्टीकरण चीनकडून कधीच न मिळाल्यामुळे भारताला चीन–पाक संबंध संरक्षणाच्या दृष्टीने कळीचे वाटतात. पाकिस्तानला नैतिक पाठिंबा आणि शस्त्रास्त्रांची मदत पुरवणे यापलिकडे पाकिस्तानने केलेल्या दु:साहसाला चीनने कधीच हातभार लावला नाही. तरीही भारत–पाक संघर्षाला चीन महत्त्वाचा घटक नेहमीच ठरत आला आहे.

३) नेपाळमधील माओवादी नेत्यांना चीन सर्व प्रकारची मदत करीत आहे. नेपाळमधील पायाभूत सुविधांवर प्रचंड गुंतवणूक करून स्वत:चे हित साधत आहे. परिणामी ८५० ते ९०० भारतीय छोट्यामोठ्या कंपन्यांना नेपाळमधून गाशा गुंडाळावा लागला आहे. कारण तेथील माओवादी कार्यकर्ते भारतीय कंपनीना विरोध तर चिनी कंपन्यांचे स्वागत करत आहेत.

४) लोकशाहीला भारताने जीवनप्रणाली मानली आहे. त्यामुळे लोकशाहीच्या विकासासाठी म्यानमार मधील लोकशाही नेता ऑंग–सॅन–स्यू–की सान यांना भारताने नेहमीच पाठिंबा दिला आहे. परिणामी तेथील लष्करशहा भारतविरोधी नाराज आहे. याचाच फायदा चीन ने घेतला. म्यानमारमधून भारतातील दहशतवाद्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक व लष्करी मदत मिळते. म्यानमार वरती दबाव टाकून बांग्लादेश पर्यंत रस्त्याच्या कामालाही चीनने मंजूरी घेतली आहे. त्यामुळे चीन म्यानमार मधील मैत्री वाढत आहे.

५) चीनने बांग्लादेशामध्ये पायभूत सुधारणा करण्यासाठी व तेथील बंदरांचा विकास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. तसेच चीन आर्थिक व लष्करी मदतही या देशाला करत आहे.

अशाप्रकारे आशियातील भारताच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी भारताच्या शेजारील देशात चीनकडून पायाभूत सुविधांच्या कोणत्या ना कोणत्या योजना सुरू आहेत. विकास योजना हे फक्त दृश्य स्वरूप आहे. मात्र या योजनांच्या नावाखाली त्या देशात पोहचण्याचा कालावधी कमी करता यावा हाच उद्देश आहे. आशिया खंडात वर्चस्वासाठी भारताच्या शेजारी राष्ट्रांना आपल्य गोटात समाविष्ट करून चीन आपला हेतू साध्य करीत चालला आहे हे भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने अतिशय घातक आहे.

**चीनी लष्कराची वाटचाल :**

चीनने जगातील बलाढ्य अमेरिकेला 'आदर्श' ठेवून आपले लष्करी सामर्थ्य वाढविले आहे. चीनबरोबर युद्धाचा प्रसंग आल्यास किंवा ओढवून घेतल्यास सामर्थ्याचा 'समतोल' कसा असेल हे पाहणे आवश्यक आहे. चीनमध्ये कम्युनिस्ट सरकारच्या स्थापनेला ६ दशके पूर्ण झाल्यानिमित्ताने चीनने काही निवडक अत्याधुनिक शस्त्रातांना संचलनात सहभागी करीत आपल्या सामरीक ताकतीचे प्रदर्शन केले खरे, पण त्यामध्ये ना अंतराळ, इलेक्ट्रॉनिक, मानसिक युद्धतंत्रात साधलेली प्रगती दाखविली गेले, ना आधुनिक युद्धासाठी राखलेल्या क्षमतेचा उलगडा करण्यात आला. संपूर्ण जगावर प्रभुत्व गाजविण्याची मनीषा बाळगणारे हे राष्ट्र स्वत:ची खरी लष्करी सिद्धता कधीही

उगड करणार नसले, तरी ही महाकाय लष्कराची वाटचाल आता थेट अमेरिकेला शह देण्याच्या दिशेने होत आहे हे निश्चित. दुसरीकडे चीन व पाकिस्तानसारख्या शेजारी राष्ट्रांशी युद्ध करण्याची इच्छा भारतातील काही घटकांना अधूनमधून कायम होत असते. भारतात घुसखोरीच्या मुद्यावरून अशा घटकांचे चीनशी दोन हात करण्यासाठी बाहू पुन्हा स्फुरू लागले आहेत. तथापि, ज्या चीनने जगातील सर्वात बलाढ्य अशा अमेरिकेला समोर ठेऊन आपले लष्करी सामर्थ्य वाढविले आहे, त्याचा युद्धात सडेतोड मुकाबला करण्यासाठी भारताला किती मोठा पल्ला अजून गाठणे बाकी आहे, हे वास्तव जाणून घेण्याची गरज आहे.

**तिअनानमेन चौकातील सोहळा :**

विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील विकास, शस्त्रस्पर्धा, परराष्ट्रीय धोरणात बदल व आर्थिक सुबत्ता अशा विविध कारणांनी सध्याच्या काळात युद्धाची व्यापकता वाढली आहे. त्यात युद्धपद्धती व युद्धतंत्रात विलक्षण बदलांची भर पडली आहे. या प्रक्रियेस जलदगतीने सामावून घेणारे राष्ट्र म्हणून जग चीनकडे पहात आहे. ६१ व्या वर्षात पदार्पण करताना तिअनानमेन चौकातील सोहळ्यात सादर झालेल्या तंत्रज्ञानांनी जो बाज अधोरेखित केला तो भव्य-दिव्य होता. त्यावेळी चीनने पारंपरिक व काही अत्याधुनिक शस्त्रास्त्रे वगळता इतर युद्धतंत्रातील सामर्थ्य प्रदर्शित करण्याचे जाणीवपूर्वक टाळले. भात्यातील अतिप्रगत शस्त्रास्त्रांची माहिती लपविण्याचा त्याचा प्रयत्न हेता. सर्वच क्षेत्रात प्रगतीच्या मार्गावर धावणारा चीन आज सर्वार्थाने बलवान झाला आहे. त्याची अफाट लष्करी ताकद अन् विशाल युद्धतीनीने तर खुद्द पेंटॅगॉनला विचार करण्यास भाग पाडले आहे. या कार्यक्रमात केवळ परदेशी नागरिक व पाहुण्यांना निमंत्रित करण्यामागे जगाला सूचक इसारावजा संदेश देण्याचा त्याचा हेतू निश्यितपणे होता. या माध्यमातून ड्रॅगनची शक्ती जोखण्यासाठी जागतिक पातळीवर सुरू झालेली चर्चा व अभ्यासाने लष्करी प्रभाव वाढविण्याच्या नियोजनात तो यशस्वी ठरला.या घडामोडींकडे एक शेजारी राष्ट्र म्हणून भारत कोणत्या दृष्टीकोनातून पाहतो ते महत्त्वाचे आहे.

**भारत-चीन संरक्षण सिद्धता :**

चीनकडून अधून-मधून काढल्या जात असलेल्या कुरापती, अरूणाचल प्रदेशाचा उपस्थित केला जात असलेला मुद्दा, सीमेवर उभारलेल्या पायाभूत सुविधा, भारतीय प्रदेशात होणारी घुसखोरी, भारताच्या शेजारी देशांशी वाढत चाललेले संबंध पाहता भारत-चीन मध्ये पुन्हा संघर्ष निर्माण होणार काय? असा प्रश्न उपस्थित केला जातो. ५० वर्षापूर्वी ज्या कारणावरून चीनने भारताशी युद्ध छेडले, तो सीमावादाचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. तो सोडविण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू असतानाच चीनने अरूणाचल प्रदेशावर दावा सांगून भारतीय हद्दीत घुसखोरी चालविल्याने हा विषय पुन्हा एकदा प्रकर्षाने पुढे आला आहे. गेल्या काही वर्षांचा विचार केल्यास चीनचे भारताला कोंडीत पकडण्याचे धोरण राहिले आहे. आशिया खंडातील एक प्रबळ शक्ती म्हणून पुढे येणारा भारत अडसर वाटत असल्याने त्यावर राजकीय व आर्थिक, प्रचार यंत्रणा, हस्तक्षेप आणि कधी कधी लष्करी बळाचा धाक दाखविण्याच्या मार्गाने सातत्याने दबाव ठेवण्याचा चीन प्रयत्न करत आहे. चीन लष्कराची घुसखोरी, अरूणाचल प्रदेश व जम्मू-काश्मीरमधील भारतीयांकरिता 'व्हिसा' देण्याच्या पद्धतीत जाणीवपूर्वक ठेवलेला वेगळा निकष हा अशाच डावपेचांचा एक भाग म्हणता येईल. विविध कारणांमुळे सध्या निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारतातील काही अविचारी मंडळी आततायीपणे चीनशी युद्ध छेडण्याचा पर्याय मांडत आहेत. परंतु, हा पर्याय महसत्ता बनण्याच्या दिशेने मार्गक्रमण करणाऱ्या भारताला पुन्हा ५० वर्षे मागे खेचणारा ठरू शकतो. पारंपरिक व आधुनिक युद्धासाठी सज्ज झालेल्या चीनची लष्करी ताकत जितकी अफाट आहे, तितकीच आर्थिक ताकदही प्रदीर्घ काळ चालणाऱ्या युद्धाचा खर्च पेलू शकेल इतकी त्याची अर्थव्यवस्था सक्षम आहे. त्या उलट भारताची स्थिती असून भरमसाठ कर्ज डोक्यावर असल्याने आर्थिक पातळीवर त्याचा निभाव लागू शकणार नाही. दोन्ही देशांकडून संरक्षण क्षेत्रावर केला जाणार खर्च लक्षात घेतला तरी ही बाब लक्षात येवू शकते. गेल्या वर्षी चीनचे अधिकृत लष्करी अंदाजपत्रक ६० बिलियन डॉलरचे होते तर भारताचा हा खर्च होता केवळ २३ बिलियन डॉलरचा. चीनच्या संरक्षणावरील खर्चाचे अंदाजपत्रक भारताच्या अंदाजपत्रकाच्या जवळपास तिप्पट आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, चीन संरक्षण क्षेत्रावर जो अधिकृत खर्च दाखवितो. त्याबददल जागतिक पातळीवर साशंकता आहे. मागील वर्षांची संरक्षण खर्चाची दाखविलेली अधिकृत आकडेवारी ६० बिलियन डॉलर असली तरी प्रत्यक्षात तो खर्च १२० बिलियन डॉलरहून अधिक असल्याचे अमेरिकेच्या संरक्षण विभागाचे म्हणणे आहे. अमेरिकेनंतर लष्करावर सर्वाधिक निधी खर्च करणारे चीन हे जगात दुसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र असून त्या क्रमवारीत भारत नवव्या स्थानावर आहे. चीन लष्करावर जसा छुपा खर्च करतो. तशी भारताची कार्यपद्धती नाही. लोकशाही राज्यव्यवस्थेमुळे भारतातील प्रक्रिया पारदर्शक आहे.

**भारत-चीन आत्मपरिक्षणाची लढाई :**

आपण मित्र किंवा शत्रू निवडू शकतो मात्र शेजारी निवडू शकत नाही. भारताचा पाकिस्तान, चीन या देशाशी सीमावाद भारतीय स्वातंत्र्यापासून आहे. चीनचा सीमावाद अनेक देशाबरोबर आहे त्यापैकी भारता बरोबरचा सीमावाद वगळता चीन सध्यातरी इतर देशांशी असणाऱ्या सीमावादाबाबत शांत आहे. जो पर्यंत भारताचा चीनशी सीमावाद संपुष्टात येत नाही तोपर्यंत चीनशी सावध राहणे महत्त्वपूर्ण आहे. भारतातील अंतर्गत हेव्यादाव्यामुळे परकीयांनी आपल्या पूर्वी आक्रमणे केली. त्यांनी आपल्यावर सत्ता गाजवली व त्यांची संस्कृती

लादण्याचा प्रयत्न केला. १९६२ साली चीन बरोबर आपण राजकीय व मुत्सदेगीरीच्या आघाडीवर कमी पडलो हे भारतीयांनी मान्य केलेच पाहिजे. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी नेपाळ, म्यानमार, बांग्लादेश, भुतान यांच्याशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित करणे महत्त्वाचे आहे. कारण चीन भारताच्या प्रत्येक शेजाऱ्याशी सलोख्याचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करीत आहे. भारताचे संरक्षण धोरण पाकिस्तान केंद्रित तर परराष्ट्र धोरणाचे तत्त्वज्ञान रशिया व अमेरिकेकडे झुकलेले आहे. चीनची नक्की काय मागणी आहे हेच भारताला समजत नाही. हा विषय मुख्य अजेंड्यावर आणण्याचे श्रेय राजीव गांधी व त्यानंतर अटलबिहारी वाजपेयी यांना द्यावे लागेल. कारण सीमाप्रश्न सोडवण्यासाठी 'इंडियाचायना बॉर्डर डिस्पुट मेकॅनिझम'ची स्थापना करण्यात आली. युद्ध नको ही दोन्ही बाजूंनी करारात घेतलेली भूमिका मात्र पूर्वी तवांग असा उल्लेख करण्यात येणाऱ्या या भागाला चीनकडून आत्ता 'दक्षिण तिबेट' म्हटले जाते. 'उत्तर तिबेट' सध्या चीनचा भाग आहे.

दक्षिण तिबेट पुन्हा मिळवणे हे चीनचे उद्दिष्ट आहे. असे असतानाही भारताकडून करण्यात येणारी वक्तव्ये त्यापेक्षा धोकादायक आहेत. समान आणि परस्पर सामंजस्याने तडजोड करीत हा प्रश्न सोडवला जाईल असे भारताकडून सांगण्यात येते. हे फारच धोकादायक आहे. भारत–चीन यांना मान्य होईल असा अर्थ यात अभिप्रेत असला तरी लोण्याचा गोळा आपल्या ताटात पडावा यासाठी चीन प्रयत्न करीत आहे. चीन बरोबर विवादास्पद स्थितीत असलेल्या भागातील एकाही भारतीय व्यक्तीला विस्थापीत होऊ देणार नाही हे पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे विधान अतिशय धोकादायक आहे. कारण विवादास्पद भागात तवांगच्या पुढे बुम्ला–थांगला–सुब्लांचू या भागात एकही भारतीय नाही. या भागात चीनकडून आक्रमण करण्यात आले आहे. त्यामुळे विस्थापनाचा प्रश्नच येत नाही. याचाच अर्थ भारताने चीन बरोबर तडजोड करण्याची भूमिका घेण्याचे संकेत दिले आहेत असा याचा अर्थ होतो. त्यानुसार अक्साई चीनवरचा हक्क भारताने सोडायचा आणि तवांगवरील दावा चीनने मागे घ्यायचा असा तो तोडगा असू शकतो. पण खरे पाहता चीन तवांगवरील दावा सोडणार नाही आणि भारताने अक्साई चीन सोडल्यास त्यासारखा अवसानघातकीपणा दुसरा ठरणार नाही. या संघर्षाच्या मुद्यामध्ये तीन महत्त्वपूर्ण बाबी आहेत. एक म्हणजे कोणत्याही सरकारला सध्याच्या परिस्थितीत तसा निर्णय घेता येणार नाही कारण पाकव्याप्त काश्मीरचा हा भाग पुन्हा भारतात समाविष्ट करून घेण्याचाठराव संसदेत करण्यात आला आहे. आणि तो ठराव बदलणे तितके सोपे नाही. दुसरे म्हणजे हा भाग सामरिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे. पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि मध्य आशिया देशांच्या सीमा या भागाला लागून आहेत. चीनच्या सिंकियांग प्रांताला या सीमा भिडल्या आहेत. त्यामुळे तेथून स्कार्डू गिलगिटमार्गे ग्वादार, कराची या पाकच्या बंदरापर्यंत चीनला रस्ता मिळाला आहे. तिसरे म्हणजे या भागात युरेनियम, सोने, लोह, नैसर्गिक वायूचे विपुल साठे आहेत. चीनकडून येथे उत्खननही सुरू आहे. या सर्व घटकांमुळे हा पाच हजार चौ.कि.मी. चा भूभाग उभय देशांच्या संबंधात कळीचा ठरणार आहे.

**भारत–चीन तुलना :**

| तपशील | भारत | चीन |
|---|---|---|
| राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर | ८.४ | १० |
| साक्षरता (टक्केवारीत) | ६८% | ९५% |
| राष्ट्रीय उत्पादन (जागतिक उत्पादनाचा हिस्सा) | ६.२% | १४% |
| विमानतळांची संख्या | ३३४ | ४८९ |
| **अर्थव्यथेतील उत्पादनाचा हिस्सा (GDP)** | | |
| अ) शेती | २०% | ६% |
| ब) सेवा क्षेत्र | ५४% | २३% |
| क) उद्योगधंदे | २६% | ७१% |

१९९० पासून संरक्षण क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक करीत चीनने अवाढव्य लष्करी साम्राज्य उभारले आहे. परिणामी, भविष्यात ज्या राष्ट्राशी त्यांचे युद्ध होईल ते केवळ एका विशिष्ट प्रदेशापुरते अथवा पारंपरिक शस्त्रास्त्रांपुरते मर्यादित राहणार नाही. आधुनिक युद्धतंत्राचा प्रभावीपणे अविष्कार दाखविण्याची संधी चीन साधून घेईल. कोणत्याही युद्धात यशस्वी होण्यासाठी सैन्यशक्ती, लष्करी सामग्री, योग्य रणभूमी, युद्ध डावपेच, घेराव पद्धती, पुरवठा व्यवस्था हे घटक महत्त्वाचे ठरतात. त्याकरिता आधुनिक प्रणालींची सांगड घालून चीनने खास व्यवस्था केली आहे. त्यांच्या केवळ पायदळाची संख्या तब्बल २२ लाख ५५ हजारहून अधिक असल्याचे सांगितले जाते. या तुलनेत भारतीय पायदळाची संख्या १३ लाख २५ हजाराच्या जवळपास. अमेरिकेच्या संरक्षण विभागाच्या म्हणण्यानुसार, चीनकडे ७५०० आधुनिक तोफा व ६७०० रणगाडे आहेत. भारताकडे बोफोर्स वगळता असणाऱ्या सर्व तोफा तीस वर्षे जुन्या असून त्यांची संख्याही बरीच कमी आहे. हवाई दलाच्या क्षमतेत भारत चीनशी बरोबरी करू शकत नाही. अलिकडेच भारतीय हवाई दलाचे प्रमुख पी. व्ही. नाईक यांनीही त्याची कबुली दिली होती. चीनच्या हवाई दलाच्या तुलनेत भारताकडे अवघी एक तृतीयांश विमाने असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. चीनच्या हवाई दलाकडे व नौदलाकडे २३०० हून अधिक लढाऊ विमाने असून, त्यांचे ४८९ हवाई तळांवरून नियंत्रण केले जाते. एफ–१०, सुखोई–३०, स्वत: विकसित केलेले जे–१०, बहुपयोगी हल्ल्यांसाठी एफ–बी–७ अशा लढाऊ विमानांचा त्यात समावेश आहे.

भारतीय हवाई दलाकडे केवळ १३३५ लढाऊ विमाने असून ३३४ हवाई तळावरून त्यांचे कामकाज चालते. यात रशियन बनावटीचे सुखोई एमकेआय-३० व फ्रान्स बनावटीचे मिराज २००० अशी काही अतिप्रगत विमाने वगळता उर्वरित मिग श्रेणीतील आहेत. मोठ्या संख्येने असलेल्या मिग २१ विमानांचे आयुष्य संपुष्टात आल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे असले तरी अजून ती वापरात आहेत.

आकारमानाच्या दृष्टीने चीनचे नौदल मोठे असून त्यांच्याकडे सागरी युद्धाचा अनुभव नाही. या नौदलात विनाशिक, अतिवेगवान लढाऊ जहाजे, युद्धनौका, आण्विक शक्तीवरील पाणबुड्या, अण्वस्त्र व इतरही क्षेपणास्त्रांनी सज्ज पेट्रोलक्राफ्ट यांची संख्या २६० हून अधिक आहे. भारतीय नौदल हे जगातील आठव्या क्रमांकाचे नौदल समजले जाते. १९७१ मध्ये पाकिस्तानशी झालेले युद्ध व सुनामीवेळी आपत्कालीन मोहिमेचा अनुभव ही त्याची जमेची बाजू. पाणबुड्या, विनाशिका, युद्धनौका, विमानवाहू नौका, लढाऊ जहाजे आदींची एकूण संख्या दीडशेच्या आसपास आहे. आण्विक हल्ल्याच्या क्षमतेत भारत चीनपेक्षा किती तरी मागे आहे. सद्य:स्थितीत चीनकडे २०० ते ४०० इतकी क्षेपणास्त्राद्वारे डागली जाणारी जिवंत आण्विक अस्त्रे अर्थात 'न्युक्लिअर वॉरहेड्स' असल्याचा अंदाज व्यक्त केला जातो. भारताकडील त्यांची संख्या ५० ते ७० हून अधिक नसल्याचे या क्षेत्रातील तज्ज्ञ सांगतात. त्यातही त्याची सर्वात प्रभावशाली चाचणी केलेले वॉरहेड ०.०५ मेगाटन्सचे असून चीनच्या तुलनेत ते अगदी कमी क्षमतेचे आहे. कारण चीनची आण्विक सामरिक अस्त्रे चार मेगाटन्स क्षमतेची आहेत.

भारतीय क्षेपणास्त्र विभाग चीनच्या क्षेपणास्त्र विभागाशी स्पर्धा करू शकत नाही, अशी स्थिती आहे. भारताच्या अग्नी-२ या सर्वात दूरवर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची अडीच हजार किलोमीटर अंतरावरील लक्ष्य भेदण्याची क्षमता आहे. एक हजार किलाग्रॅमचे अण्वस्त्र ते वाहून नेहवू शकते. ब्राम्होस हे रशियाच्या मदतीने बनविलेले क्रूज क्षेपणास्त्र वैशिष्ट्यपूर्ण असून त्याचा वेग अमेरिकेच्या 'टॉकहॉक' क्षेपणास्त्राच्या तिप्पट आहे. दुसरीकडे चीनच्या लष्कराची खरी ताकद क्षेपणास्त्र विभागात आहे. दीड हजार ते १३ हजार किलोमीटर अंतरावर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांचे स्वतंत्र दल आहे. डी एफ-३१, डी एफ-३१ ए या आंतरखंडीय क्षेपणास्त्राद्वारे तो अमेरिकेसह जगातील कोणत्याही भागात हल्ला चढवू शकतो. भारताच्या सीमेलगत तैनात केलेली सीएसएस-३ व सीएसएस-५ ही क्षेपणास्त्र अण्वस्त्र वाहून नेऊ शकतात. त्यांची अनुक्रमे १७५० व ५००० किलोमीटरहून अधिक अंतरावर मारा करण्याची क्षमता आहे. या क्षेपणास्त्रांच्या माऱ्याच्या टप्प्यात भारतातील सर्व प्रमुख शहरे येततात. फिरत्या यंत्रणाद्वारे क्षेपणास्त्र डागण्याची यंत्रणा ही या दलाची आणखी एक भक्कम बाजू. अत्याधुनिक टेहळणी यंत्रणा, हवाई हल्ल्याची पूर्वसूचना देणारी यंत्रणा, क्षेपणास्त्र व हवाई हल्यांविरोधी यंत्रणा आदी पातळीवर तो अमेरिकेशी स्पर्धा करीत आहे.

पारंपरिक युद्धाबरोबर आधुनिक युद्धाची भक्कम तयारी करण्यामागे त्याचा मुख्य रोख हा शत्रूला लढाईपूर्वीच निष्प्रभ करण्यावर आहे. इलेक्ट्रामॅग्नेटीक युद्धतंत्रात शत्रूची संपर्क व्यवस्था बंद पाहण्याची क्षमता त्यापैकीच होय. संपर्क व्यवस्था बंद पडली तर आपोआप लष्कराच्या हालचालींवर मर्यादा येतील. या माध्यमातून शत्रूचे मनोधर्य खच्ची करण्याचे नियोजन त्यात अंतर्भूत आहे. तसेच शत्रूराष्ट्राचे टेहळाणी व माहिती दळणवळण व्यवस्थेचे उपग्रह चीन उपग्रहविरोधी क्षेपणास्त्राद्वारे भेदू शकतो. युद्धकाळात भेदू शकतो. युद्धकाळात उपग्रह नष्ट केला गेला तर त्याचे विपरित परिणाम केवळ लष्करी क्षेत्रालाच नव्हे, तर नागरी क्षेत्राला सहन करावे लगतील याचे भान भारताला व विशेषत: युद्धखोरीची भाषा करणाऱ्या मंडळींना ठेवावे लागणार आहे. अंतराळ संपत्ती सुरक्षित ठेवण्यासाठी भारताची कोणतीही विशेष यंत्रणा सध्या अस्तित्वात नाही. अंतराळातील प्रगतीमुळे भविष्यात 'स्पेस वॉर' होण्याची भीती निर्माण झाली असून तसे युद्ध होऊ नये म्हणून योग्य ती खबरदारी घेण्याची गरज खुद्द माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी व्यक्त केली आहे. युद्धकाळात पायदळ, हवाई दल व नौदल या अवाढव्य लष्कराच्या संयुक्त कार्यवाहीच्या व्यवस्थापनासाठी चीनने खास यंत्रणा विकसित केली आहे. संयुक्त चढाई व संख्यात्मक बदलासाठी केंद्रीय लष्करी आयोगात सेवा कमांडरचे नवीन पद निर्माण केले आहे. चीन या दिशेने झपाट्याने पाऊले टाकत असताना भारत तिन्ही सेनादलांच्या संयुक्त व्यवस्थापनासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक आजतागायत करू शकलेला नाही.

१९६२ साली चीनशी युद्धात झालेल्या पराभवाचा अभ्यास करून भारताने पुढील काळात सैन्य सामुग्रीतील उणीव भरून काढण्यासाठी पर्वतीय व जंगल युद्धावस्थेवर आधारित प्रशिक्षणासाठी लष्करी संस्थांचा विस्तार, दारूगोळा व छोट्या शस्त्रास्त्रांच्या उत्पादनासाठी ऑर्डनन्स फॅक्टरिज्, रशियाच्या मदतीने लढाऊ विमानांच्या बांधणीसाठी कारखान्यांची स्थापना, संरक्षण संशोधन व विकास प्रतिष्ठान संस्थेमार्फत लष्करी तंत्रज्ञानात सुधाणा अशा विविध मार्गानी सज्जता राखण्यावर भर दिला आहे. पण असे असले तरी अत्याधुनिक लष्करी सामग्री, टेहाळणी यंत्रणा अशा विविध लष्करी सामग्रीसाठी त्याला दुसऱ्या राष्ट्रांवर अवलंबून रहावे लागते. चीनदेखील काही आधुनिक तंत्रज्ञानासाठी इतरांवर अवलंबून असला तरी पारंपरिक शस्त्रास्त्रांच्या निर्मितीत तो स्वयंपूर्ण बनण्याच्या मार्गावर आहे. आपली लष्करी साधन सामग्रीची गरज पूर्ण करताना त्याने शस्त्र निर्यातीवर विशेष लक्ष केंद्रीत केले गेले आहे. गेल्या पाच वर्षात जगातील विविध देशांना तब्बल सात बिलियन डॉलरच्या शस्त्रास्त्रांची विक्री केली आहे. शस्त्रविक्री व लष्करी प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देत त्याने मित्र राष्ट्रांची संख्या वाढविली आहे. दीर्घकालीन लष्करी संबंधांमुळे पाकिस्तान हे चीनच्या पारंपरिक

शस्त्रास्त्रांची खरेदी करणारे प्रमुख राष्ट्र बनले आहे. चीनच्या एकूण निर्यातीपैकी ३६ टक्के शस्त्र एकट्या पाकिस्तानने खरेदी केल्याचे अमेरिकेच्या संरक्षण विभागाचा अहवाल सांगतो. जे एफ-१७ ही लढाऊ विमाने व त्यांच्या उत्पादनासाठी पाकिस्तानात सुविधा उपलब्ध करून देणे, एफ-२२ पी लढाऊ जहाज, हेलिकॉप्टर, के-८ जेट ट्रेनर्स, टी-८५ रणगाडे, एफ-७ विमाने आणि जहाजविरोधी व अन्य क्षेपणास्त्रांची विक्री व तंत्रज्ञान हस्तांतरण आदींचा त्यात अंतर्भाव आहे. या शिवाय, बांग्लादेश, बर्मा व श्रीलंका या भारताशेजारील राष्ट्रांबरोबर सुदान, इराण, नायजेरिया आदी राष्ट्रांना तो शस्त्रपुरवठा करतो. जगात सर्वश्रेष्ठ मानला जाणारा त्याचा क्षेपणास्त्र विकास कार्यक्रम सध्या विविध क्षमतेच्या क्रूझ व इतर क्षेपणास्त्रांचे उत्पादन वाढविण्यात गुंतला आहे. गेल्या काही वर्षात रशिया हा चीनचा शस्त्र व साधनसामग्रीचा मुख्य पुरवठादार राहिला. अतिप्रगत लढाऊ विमाने, क्षेपणास्त्र यंत्रणा, पाणबुड्या विनाशिका आदी सामग्रीची खरेदी करतानाच त्यांच्या उत्पादनाचे हक्कही मिळविण्यात आले. इस्त्रायलने अलिकडे अत्याधुनिक तंत्रज्ञान चीनला उपलब्ध करून दिले आहे. जगातील जहाजबांधणी उद्योगात मागील वर्षी जपानला मागे टाकून चीन दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत विमानवाहू नौका, युद्धनौका, पाणबुड्या अशी विविध सामग्री निर्माण करण्याची क्षमता त्याने प्राप्त केली आहे.

**भारत – चीन संबंध :**

भारत-चीन संबंध सुरवातीपासूनच चांगल्या प्रकारचे नाहीत. चीनच्या आव्हानावर मात करण्यासाठी भारतानेही आपल्या आर्थिक क्षमतेनुसार लष्करी सामर्थ्य वाढवण्यास सुरूवात केली व ११ व्या पंचवार्षिक योजनेत संरक्षणावर अवाढव्य खर्च करण्यास सुरूवात केली.

**अ ) भारत विरोधी चीनची तयारी –**

१) फिलॉसॉफी ऑफ पॉवर यात तत्त्वाचा आधार घेत भारताला संघर्षात गुंतविणे. याला 'पीपल्स वॉर' असे स्वरूप देण्याचा चीनकडून प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी ईशान्य भारतातील नागा, मिझो, एनएससीएन अशा बंडखोरांच्या संघटनांना बळ देण्याचा प्रयत्न चीनकडून केला जात आहे.

२) स्वत:ची क्षमतावृद्धी करून भारताच्या शेजारी देशात पाय रोवणे ही चीनची महत्त्वपूर्ण चाल आहे. कारण यामुळे भारताला सागरी व भूमार्गे जखडण्याचा प्रयत्न आहे.

३) भारतातील माओवाद्यांना बळ देणे कारण भारतातील ११ राज्यातील १७३ जिल्ह्यात पसरलेला हा 'लाल धोका' चीनी आक्रमणाच्या वेळी नेपाळपासून आंध्रप्रदेश पर्यंत चीन लष्कराला मदत करू शकतो.

४) चीनने तिबेटमध्ये रेल्वेलाइन निर्माण केली. रस्त्याचे जाळे निर्माण करण्याबरोबरच अनेक विमानतळे बांधून मोठ्या प्रमाणावर सैन्य हालचालीची पूरक अशी यंत्रणा विकसित केली आहे.

५) राजकीय दृष्ट्या संवेदनशील असा बौद्ध धर्मीयांचा मठ अरूणाचल प्रदेशातील तवांग येथे असून तो भारताच्या ताब्यात असणे चीनला सतत खुपत आहे. तवांग येथे भारताने स्वत:ची तटबंदी इतकी मजबूत केली आहे की त्यामुळे चीनला धक्का बसला आहे. परिणामी भारताला प्रत्युत्तर म्हणून पाकव्याप्त काश्मीरमधील गिलगिट येथे चीनने स्वत:चे सैन्य पाठवले.

६) भारताच्या सुखोई विमानांच्या लष्करी तळामुळे चीनला भारताबाबत शंका आली या विमानांच्या टप्प्यात तिबेट रेल्वे येत असल्याने चीनने नवे हायवे रस्ते बांधण्यास सुरूवात केली.

७) चीनने त्यांचा ३१८ क्रमांकाचा नॅशनल हायवे दुरूस्त केला. हा हायवे चीनच्या लष्कराच्या ५२ व्या मेकॅनाईजड ब्रिगेडचे मुख्यालय लिंझी हे शहर तिबेटची राजधानी ल्हासाला जोडले.

८) भारतीय सीमेला लागून चीनने मोठ्या प्रमाणात लष्करी हालचालीची जय्यत पूर्वतयारी केली आहे.

९) चीनने इमर्जन्सी रिझॉल्व्हिंग मोबाईल कॉम्बॅट फोर्स नावाने एक लष्करी दल तयार करून एका दिवसात शत्रूराष्ट्राच्या सीमेवर लष्कराच्या ४ डिव्हिजन्स आणण्याची क्षमता प्राप्त केली आहे.

१०) २००९ साली चीनच्या ५० हजार सैन्यांनी चीनच्या सीमेवरून १६०० कि.मी. हालचाली केल्या आहेत.

११) तिबेटमध्ये चीनचे पूर्वीचे ३ लष्करी तळ आहेत. २००९ मध्ये चीनने ल्हासाजवळ दोन नवीन विमानतळ बांधले.

१२) चीनने नवीन ४ अत्याधुनिक क्षेपणास्त्रे लष्करी प्रदेशातील कमांडकडे सोपवली आहेत. त्यामुळे युद्ध काळात चीनचे कमांड अधिकारी अशा क्षेपणास्त्राचा वापर करू शकतात. पण त्याच दर्जाच्या भारतीय अधिकाऱ्यावर मात्र अनेक बंधने आहेत. तसेच इच्छा असूनसुद्धा अशा प्रकारची क्षेपणास्त्रे भारतीय कमांड अधिकारी चीनवर डागू शकणार नाहीत.

१३) गिलगिट वझारात चा परिसर पाकव्याप्त काश्मीर मध्ये आहे. या भागामध्ये पाकिस्तानी कमी परंतू चीनी जास्त अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्या भागात लष्करी तळ निर्माण करण्याचा चीनचा मानस आहे.

१४) पाकिस्तान व चीनच्या मैत्रीपूर्ण संबंधात काराकोरम महामार्गाला विशेष महत्त्व आहे. चीनने व्यापार व आयात-निर्यात साधनाच्या वाहतूकीकरिता काराकोरमसह किनारपट्टी लगतच्या महामार्गासाठी मोठी गुंतवणूक करून रेल्वेमार्ग विकासाची योजना मांडली आहे.

१५) बलुचिस्तानमधील 'ग्वादार' या बंदराच्या माध्यमातून चीन-पाक या राष्ट्रांच्या आर्थिक विकासाला नवे परिमाण निर्माण झाले. या बंदराला सामरिकदृष्ट्या असणारे महत्त्व हा या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. पाकिस्तानच्या किनाऱ्यावरील या बंदरावर अत्याधुनिक यंत्रणा उभारून चीन ओमानचे आखात व भारतीय नौदलाच्या अरबी समुद्रातील हालचालींवर बारकाइने लक्ष ठेवत आहे.

१६) 'हंबडतोडा बंदर' खनिजतेल पुरवठ्याचे मार्ग सुरक्षित राखण्याकरिता चीनने श्रीलंकेशी सामंजस्य करार करून हंबडताडा प्रकल्पात बंदराचा विकास केला. या बंदराच्या माध्यमातून चीनी नौदलाचे हिंदी महासागरात अस्तित्व निर्माण करण्यात चीन यशस्वी झाला आहे.

१७) २०१० मध्ये चीनने काश्मीर हा वादग्रस्त प्रदेश असल्याची भूमिका घेतली. पाक-भारतामध्ये मध्यस्थी करण्याची भूमिका घेतली.

१८) २००९-१० मध्ये लडाखमध्ये अनेकवेळा चीनी लष्कराने घुसखोरी केली होती.

१९) जम्मू-काश्मीरमधील फुटीरवादी नेते व हुरियत कॉन्फरन्सचे नेते मीरवाईज उमर फारूख यांना चीनने भेटीचे निमंत्रण दिले.

२०) काश्मीरमधील नागरिकांना चीनचा व्हिसा देताना त्याचा शिक्का त्या नागरिकाकडे असलेल्या भारतीय पासपोर्टवर न मारता त्याला 'व्हिसा स्टॅपल' केला.

२१) ब्रह्मपुत्र नदी मोडण्याची चीनची योजना आहे.

२२) सप्टेंबर २०१० मध्ये चीनने भारताचे लषकरी अधिकारी लेप्टनंट जनरल बी. एस. जसवाल यांना चीनचा व्हिसा नाकारला.

२३) लडाख मध्ये तीन बाजूंनी चीनी लष्कराने घेरलेले दिसून येते. लडाखमध्ये भारतीय सैन्याला घेरण्याची चीनची भूमिका म्हणजे भारताने अरूणाचल प्रदेशामध्ये केलेल्या तटबंदीला चीनचे प्रत्युत्तर आहे असाच याचा अर्थ होतो.

**ब ) चीन विरोधी भारताची तयारी :**

चीन लष्करावर करत असलेला खर्च व लष्कराच्या हालचाली यावर भारतानेही डोळे झाक न करता सीमेवर त्वरित सैन्य जमविण्यासाठी आवश्यक अशी पायाभूत संरचना विकसित केल्या त्या पुढीलप्रमाणे.

१. भारताने आपल्या क्षमता वृद्धीकडे गांभीर्याने लक्ष दिले आहे. तसेच 'एरिया ऑफ इंटरेस्ट' आणि 'एरिया ऑफ इन्फ्लुअन्स' वाढण्याचा प्रयत्न सध्या जोरदार चालू आहे.

२. व्यापाराच्या माध्यमातून परस्पर संबंध वाढवून लष्कराची जय्यत तयारी केली आहे. शेवटी क्षमता वाढली की सामर्थ्य वाढते आणि क्षमता व सामर्थ्य दोन्ही वाढल्यास हेतू बदलतात यावर भारताने भर दिलेला आहे. यामुळेच चीनबरोबर सुसंवाद सुरू ठेवला आहे.

३. भारताने अरूणाचल प्रदेशात व अन्यत्र सीमेवर ७३ ठिकाणी रस्ते निर्मिती करण्यावर भर दिला. या रस्त्याची लांबी ३६४७ कि.मी. आहे. ७३ रस्त्यापैकी ६१ रस्ते हे जम्मूकाश्मीर, हिमाचल प्रदेश, सिक्कीम, उत्तराखंड आणि अरूणाचल प्रदेश या राज्यांच्या सीमेलगत आहेत. १४ रस्त्याचे काम पूर्ण आहे. बाकीच्या रस्त्याचे काम जोरात सुरू आहे.

४. रस्त्याचे काम चालू असतानाच दुसऱ्या बाजूला भूदल व हवाई दलाने त्यांची मारक क्षमता या भागात वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत.

५. सीमेलगत हेलिपॅड बांधले आहेत.

६. अरूणाचल प्रदेशात सीमा रेषेला लागून लष्करी तुकड्यांची पुनर्रचना केली आहे.

७. चीनचा धोका ओळखून भारताच्या संरक्षण मंत्रालयाने भारतीय हवाई दलाला त्याचे पुणे येथील सुखोई-३० एम के आय लढाऊ विमानाचे स्क्वॅड्रन उत्तरप्रदेशातील बरेली येथे हालवण्याची परवानगी दिली. कारण तेथून ही विमाने तिबेटच नव्हे तर चीनच्या अंतर्गत भागात हवाई हल्ले लवकर करू शकतात.

८. २०१० मध्ये आसामामधील तेजपूर येथे सुखोई विमानाचे स्क्वॅड्रन तयारीत ठेवले आहे.

९. चीनने तिबेटचे लष्करीकरण केल्यामुळे भारताने अरूणाचल प्रदेशात तटबंदी केली. या

१०. भागात भारताने चीनचा संभाव्य धोका ओळखून २००९-१० मध्ये ऑपरेशन फाल्कन सुरू केले आहे.

११. चीनचे लष्करी सामर्थ्य लक्षात घेऊन भारताने तिबेटमध्ये गरज पडल्यास २५ डिव्हिजन्स उतरविण्याची तयारी केली आहे.

१२. अरूणाचल प्रदेशातील तुर्तांग, पाशीघाट, विजयनगर, अलाँग आणि मेचुंगा येथे हेलिकॉप्टरसाठी धावपट्ट्या तयार करण्यात आलेल्या आहेत.

१३. लडाखमध्ये लष्करी आड्डे व विमानतळाचे अद्यावतीकरण केले आहे.

१४. चीनच्या सीमा रेषेपासून २० कि.मी. अंतरावर 'न्योमा' येथे असलेल्या धावपट्टीचे आधुनिकीकरण केले आहे.

१५. न्योम पासून जवळच हुपचे आणि दौलतबंग ओल्डी येथे नवीन धावपट्ट्या तयार करण्यात आल्या आहेत.

१६. हिमाचल प्रदेशातील ७६० गावामध्ये पर्यावरणाच्या कारणावरून रस्ते बांधण्यास केंद्रीय पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांनी केलेला विरोध मागे घेऊन रस्ते बांधण्यास परवानगी दिली.

१७. भारत सरकारने जम्मू व काश्मीर मधील रोहतांग बोगदा बांधण्यास मंजूरी दिली या बोगद्यामुळे लडाख भागात भारतीय सैन्याची हालचाल वर्षभरात कधीही करता येऊ शकते. या बोगद्यामार्गे भारतीय लष्कराला अन्न, इंधन, शस्त्रसाठा व सैन्य यांचा पुरवठा करता येतो.

१८. भारताने हिंदी महासागरातील स्वत:ची नौदल गस्त वाढविलेली आहे. रशियाकडून दहा वर्षासाठी भारताने 'नेरपा' ही अणूपाणबुडी २०१० मध्ये घेतली आहे.

१९. भारताच्या अग्नी-४ क्षेपणास्त्राचा पल्ला ४ हजार कि.मी. चा आहे. त्यामुळे संपूर्ण चीन भारताच्या क्षेपणास्त्राच्या टप्प्यात येतो.

**सारांश**

१९६२ च्या भारत चीन युद्धाने दिलेला धडा आपल्याला आजही लक्षात ठेवावा लागेल. चीनबरोबरील समस्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. चीनची महत्त्वकांक्षा आणि डावपेच ओळखत संरक्षणदृष्ट्या सज्ज होण्यासाठी खंबीर व कठोर पावले उचलावी लागतील आणि त्याचबरोबर संवाद ही वाढवावा लागेल. कारण सद्य:स्थितीत भारत व चीन दरम्यानची स्थिती काही अंशी दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया यांच्यामध्ये निर्माण झालेल्या शीतयुद्धासारखी आहे. तैवानसह स्वत:शी संबंधित कोणत्याही वादात अमेरिकेला हस्तक्षेप करता येऊ नये आणि झाल्यास त्याचा सामना करण्याची तयारी चीनने ठेवली आहे. भारत आणि चीन या देशांमधील संबंध १९६२ पासून जे बिघडलेले आहेत त्यात फारशी सुधारणा नंतर कधीच झाली नाही. अलीकडे चीनचे पंतप्रधान हू जिंताओ भारताच्या दौऱ्यावर येऊन गेले. त्यातून भारताबरोबरचे आर्थिक संबंध दृढ करण्याचा चीनचा प्रयत्न होता. तो बऱ्यापैकी यशस्वीही झाला. चीनची विस्तारवादी भूमिका आणि भारताबरोबर कुरापती काढण्याचे धोरण काही थांबले नाही. सीमावाद असो वा स्टेपल्ड व्हिसाचे प्रकरण असो. चीनच्या या धोरणात काहीही बदल झालेला नाही. तसेच ईशान्य भारतात चीनने अप्रत्यक्ष युद्धाला केव्हाच सुरूवात केली आहे. अलीकडेच नागालँडच्या नॅशनल सोशॅलिस्ट कौन्सिल ऑफ नागालिम (आय एम) चा नेता अँथनी शीमरे याने सुरक्षा यंत्रणे समोर दिलेल्या कबुली जबाबात ही बाब उगड झाली आहे. भारत-पाक संबंधाची व पाकच्या घुसखोरीची चर्चा आपण सर्वजण करतो. परंतू चीनच्या या ईशान्य कडे होत असलेल्या घुसखोरीकडे दुर्लक्ष झालेले दिसते.

अशा परिस्थितीत निर्माण झालेली आव्हाने भारताने योग्य पद्धतीने हाताळणे आवश्यक आहे. भारतीय सेनादलाचे मनोबल उच्चस्तरावर असून कोणतेही संकट परतवून लावण्याची त्याची सामरिक तयारी आहे. मात्र, याचा अर्थ असा नव्हे की, आपणही आक्रमक संरक्षणाचे धोरण स्वीकारायला हवे. युद्धाने सर्वच प्रश्नांवर तोडगा काढता येत नाही हे अमेरिकेच्या इराक व अफगाणिस्तानातील युद्धाने सिद्ध केले आहे. त्यामुळे सीमावादावरून निर्माण झालेल्य तणावावर इतर पर्यायांनी मार्ग शोधणे हेच आज भारताच्या हिताचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) India's Neighbourhood : Challenges in the Next Two Decades – Rumel Dahiya and Ashok K. Behuria, 2012.

२) India's Border Management : Select Documents, Editor – Pushpita Das, 2010.

३) China's Path To Power : Party, Military and The Politics of State Transition – Jagannath P. Panda, 2010.

४) Comparatative Politics and International Relations – Prakash Chander, Prem Arora.

५) About Com. Economics – Impact of Globalisation on Developing Countries and India by Chandrasekaran Balekrishnan.

६) भारताची आर्थिक पाहणी - २०१०.

७) जागतिक राजकारात भारत - वसंत रायपूरकर.

८) http://marathibmm.blogpot.com/foreignpolicy.html

९) दै. महाराष्ट्र टाईम्स